महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
सर्व्हे नं ८३२ ए,फायनल प्लॉट नं १७८व१७९,भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे ४११००४
फो.नं,०२०२५७०५००० फॅक्स नं ०२०२५६६५८०७

# परिपत्रक

क्र.रा. म./संशोधन/ इ.१२वी संस्कृत/5716 दिनांक-२३/१०/२०१८ 30

**विषयः- उच्च माध्यमिक स्तरावरील इ.१२वी संस्कृत या भाषा विषयाची कृतिपत्रिका सन २०१८-२०१९ पासून संस्कृत भाषेतूनच उपलब्ध करून देणेबाबत.**

या परिपत्रकाव्दारे महाराष्ट्रातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक /कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य/संस्थाचालक ,शिक्षक,विद्यार्थी व सर्व संबंधितास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक स्तरावरील इ.१२वी संस्कृत या भाषा विषयाची कृतिपत्रिका सन २०१८-२०१९ पासून म्हणजेच फेब्रुवारी-मार्च २०१९ च्या परीक्षेपासून संस्कृत भाषेतूनच (माध्यमातून) उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

माध्यमिक स्तरावरील इ.९वी साठी सन २०१५-२०१६ मध्ये प्रश्नपत्रिकेऐवजी कृतिपत्रिका हा बदल केला आहे. हाच बदल सन २०१६ - २०१७ मध्ये इ.१०वीं साठी करण्यात आला आहे. उच्च माध्यमिक स्तर (इ.११वी /इ.१२वी) हा शालेय स्तर व उच्च शिक्षण यांना जोडणारा महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे शालेय पातळीवर केले गेलेले बदल हे उच्च माध्यमिक स्तरावर येणे अपरिहार्य आहे.

त्यानुसार सन २०१७-२०१८ मध्ये इ.११ वी संस्कृत विषयासाठी प्रश्नपत्रिकेऐवजी कृतिपत्रिका आणण्यात आली आहे. आणि सन २०१८-२०१९ मध्ये इ.१२वी साठी संस्कृत विषयाची कृतिपत्रिका वापरण्यात येणार आहे. त्यानुसार संस्कृत भाषा विषयाची कृतिपत्रिका फक्त संस्कृत भाषेतच (माध्यमात) काढली जाणार आहे. यापूर्वी सदर प्रश्नपत्रिका एकूण चार माध्यमातून काढली जात होती. परंतु सन २०१५-२०१६ पासून माध्यमिक स्तरावर सदर बदल केला गेला आहे. याची उत्तरेही विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतूनच लिहिणे अपेक्षित आहे.

सदर बदलाची पार्श्वभूमी राज्यमंडळाचे शिक्षण संक्रमण अंकात वेळोवेळी प्रसिध्द केली आहे. तसेच इ.९वी च्या संस्कृत कृतिपत्रिकेमध्ये (पृष्ठ क्र.५,६ ) इ.१०वी संपूर्ण संस्कृत (पृष्ठ क्र.३,३२)इ.११वी संस्कृत (पृष्ठ क्र.३,३६) इ.१२वी संस्कृत (पृष्ठ क्र.३,८)या कृतिपत्रिकेमध्ये नमूद केलेले आहे. इ.१२वीची कृतिपत्रिका (लेखी परीक्षा ) एकूण ८० गुणांची असेल व मौखिक परीक्षा एकूण २० गुणांची असेल त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही. तसेच पाठयपुस्तकामध्येही बदल केलेला नाही.

इ.१० वी च्या बदललेला आराखडयानुसार एकूण चार परीक्षा झालेल्या आहेत ते विद्यार्थ्यांना पूर्णपणे सरावाचे झालेले आहे. जे विद्यार्थी इ.१०वी पर्यंत संस्कृत भाषा शिकले आहेत तेच विद्यार्थी प्रामुख्याने इ.११वी व इ.१२वी संस्कृत भाषा अभ्यासतात असे निदर्शनास येते. सदर विद्यार्थी मार्च २०१९ मध्ये इ.१२वी च्या परीक्षेला प्रथमच प्रविष्ठ होतील. त्यामुळे संस्कृत भाषा विषयाची इ.१२वी ची कृतिपत्रिका फक्त संस्कृत भाषेतूनच उपलब्ध करून देण्यात येणार आहे. [विभाग १ड, २ड,(ससंदर्भ स्पष्टिकरण ) ३ब (स्थुलवाचन) ५ब (अपठित वेच्याचे भाषंतर/प्रश्ननिर्माण ] या चार प्रश्नांची उत्तरे विद्यार्थी मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती या चारपैकी एका माध्यमातून लिहू शकतात. याबाबत विद्यार्थी, शिक्षक व सर्व संबंधित यांनी याची कृपया नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

सचिव
राज्य मंडळ, पुणे

प्रति,

क्रं.कोविमं./उच्च माध्य./गोप/२०१८/ 2116
दिनांक - ०३/११/२०१८

प्राचार्य,
मंडळ कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

उपरोक्त परिपत्रकाची नोंद घेवून सर्व विषय शिक्षकांचे निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करावी.

(टी.एल. मोळे)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.